(स्थापना. - १९८७)
लोक शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा द्वारा संचालित
लोक महाविद्यालय, वर्धा

क्रमांक लोम वि/ दिनांक : ..............................

## लोक महाविद्यालय, वर्धा
## राष्ट्रीय सेवा योजना २०१७ - २०१८
## अहवाल ( नियमित कार्यक्रम)

महाविद्यालयाला सन २०१७ - २०१८ मध्ये रा.तु. महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा १५० स्वयंसेवाकाचे पथक मंजूर करण्यात आले होते. महाविद्यालयात एकूण मुले ६० व ९० मुलींची नावे नोंदविण्यात आली. महाविद्यालयीन स्तरावर मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शक समितीचे गठण करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने जुन्या रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयात सभेचे आयोजन करण्यात आले. याच सभेमध्ये बी.ए. प्रथम व बी.कॉम. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे नामांकन करण्यात आले.

मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने रा.से.यो.च्याद्वार या सत्रामध्ये अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. ११जुलै २०१७ ला 'जागतिक लोकसंख्या दिन' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सौ. तायडे तर प्रमुख पाहूणे प्रा. डॉ. साहूरकर होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे आणि अध्यक्ष यांनी जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्व सांगून लोकसंख्या वाढीचे दुष्परीणाम व निर्माण झालेल्या समस्या यावर भाष्य केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. पवन धवने व आभार प्रदर्शन कु. आहाटे हीने केले.

दि. १५ ऑगष्ट स्वातंत्र्यदिनामित १४ ऑगष्टला श्रमदान करुन स्वच्छता करण्यात आली. १५ ऑगष्टला विद्यार्थ्यांची भाषणे व भक्तीगीताचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ८ सप्टेंबर २०१७ रोजी हनुमान टेकडी येथील परीसरात सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत श्रमदान करण्यात आले. वृक्षासभोवतालचा कचरा काढणे, आळे करणे, गाजर गवत निर्मूलन इत्यादी त्यानंतर मा. मारुती चित्तमपल्ली (पक्षीतज्ञ व माजी संचालय वनविभाग) यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषद कार्यपालन अधिकारी नयना गुंडे,

उपवनसंरक्षक श्री. शर्मा, निसर्ग सेवा समितीचे मुरलीधर बेलखोडे यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला एकूण ६ महाविद्यालयाचे रा.से.यो.चे विद्यार्थी होते. लोक महाविद्यालयाचे ३४ मुले मुली त्या ठिकाणी सहभागी होत्या. वनाचे महत्व व पक्षी मित्रत्व यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

दि. ११ सप्टेंबर २०१७ ला विश्वबंधुता दिन व विनोबा भावे जयंती निमित्य कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. साहूरकर तर प्रमुख पाहूणे प्रा. डॉ. भिमनवार होते. याप्रसंगी विवेकांनंद केंद्र येथील विवेकजी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पाहूण्यांनी स्वामी विवेकानंदाच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदाचे विचार अंगिकारण्याचे आव्हान केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विश्वनाथ बेताल तर आभार प्रदर्शन कु. प्रणाली मुडे हीने केले.

२४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजानन कोटेवार प्रमुख अतिथी मा. जयश्री गफाट शिक्षण व आरोग्य सभापती जि. परिषद वर्धा, मा. प्रकाश भोयर हे होते. कार्यक्रमाची सुरवात महात्मा गांधीच्या प्रतिमेला हारार्पण करुन झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी प्राचार्य डॉ. अविनाश साहूरकर यांनी केले.

आपल्या प्रमुख भाषणात सभापती जयश्री गफाट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना आपल्या जीवनातील रा.से.यो. चे काही अनुभव सांगितले. स्त्री पुरुष यांनी एकमेकाला समजून घेतल्याशिवाय माणसाला मोठ होता येत नाही. विद्यार्थ्यांना जीवनात मोठे व्हायचे असेल तर मोठी स्वप्ने बघून ते साकार करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी व्यसनाधिनता सोडून समाज व्यसनाधीन केले पाहिजे त्याशिवाय आरोग्य चांगले राहणार नाही. आपल्या मनात डोकावून आपल स्वतःला ओळखले पाहिजे मदत करण्यासाठी तत्पर असले पाहिजे.

याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आणि समाजातील धनाढय लोकांना आव्हान करतांना त्यांनी सांगितले की शिक्षणाचे कुपोषण थांबले पाहिजे. मुलांवर चांगले संस्कार झाले पाहिजे. समाजातील बिघडल्या अवस्थेला दुरुस्त करण्याचे काम रा.से.यो. च्या मुलांनी करावे असे आव्हान केले. याप्रसंगी श्री. प्रकाश भोयर यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विश्वनाथ बेताल तर आभार प्रदर्शन प्रा. सुनिल पाटणे यांनी केले.

२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७:३० ते ९:३० पर्यंत रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. महाविद्यालय आणि महाविद्यालयाच्या [illegible] परिसर स्वच्छ केला. गाजर गवत काढले. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. कोटेवार संस्थेचे सचिव प्रकाश भोयर कार्यकारी प्राचार्य डॉ. साहूरकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले या प्रसंगी प्रा. पाटणे यांनीही श्रमदानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. डॉ. कोटेवार व प्राचार्य साहूरकर यांनी विद्यार्थ्यांना गांधीजींचे शांती- अहिंसेचे विचार सांगितले. संचालन पवन धवने तर आभार प्रदर्शन विकास नाखले यांनी केले.

दि. ४ ऑक्टोबर २०१७ रोजी अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे अध्यक्ष मा. पन्नालालजी सुराणा यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. 'आजची आर्थिक स्थिती व समाजपुरुषाचे विचार' यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. ३/१२/२०१७ रोजी 'अनाथाचे बाबा' 'शंकरबाबा' पापळकर यांनी महाविद्यालयातील रा.से.योजनेच्या विद्यार्थ्यांशी हितगुज करुन गाडगेबाबांची व तुकडोजी महाराजांची शिकवण अंगिकारण्याचा सल्ला दिला. सोबतच जी मुले निराधार आणि अनाथ आहे. त्यांच्यासाठी आपण काम करावे. दिव्यांगासाठी मदत करुन त्यांना समाजात स्थान देण्याचा प्रयत्न करावा असे स्वतःच्या अनुभवातून सांगितले. ते म्हणाले मी अनेक अनाथ आणि दिव्यांगांना जवळ करुन मायेच्या ममतेने वागविले. त्यांची राहण्या-खाण्यापिण्याची सोय करुन त्यांची लग्नेही लावून दिली. आपण यातल खारीचा वाटा उचलवा असे आव्हान केले. त्यांचे पुनर्वसन करावे असे आव्हान केले. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी त्यांना प्रश्न विचारुन उत्तरे शोधली.

दि ६/१२/२०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. साहूरकर तर प्रमुख पाहूणे डॉ. अनिल सुरकार प्रा. सुनिल पाटणे होते. कार्यक्रमाची सुरुवात फोटोला हारार्पण करुन व श्रध्दांजली गीताने झाली. प्रा. डॉ. सुरकार आपल्या भाषणात म्हणाले बाबासाहेब म्हणजे एक विचार, एक ग्रंथ आणि ज्ञानाचा महासागर आहे. त्यांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. त्यांचे ग्रंथ, त्यांचे वाचन हे आपल्यासाठी एक सामर्थ्यशाली आव्हान आहे. आपले विचार व्यक्त करतांना डॉ. विश्वनाथ बेताल यांनी बाबासाहेबांच्या शिलचरणाविषयी माहिती त्यांच्या विचाराला शीलची जोड असल्याने त्यांनी विद्वानकिची उंची गाठली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही विचार व्यक्त केले. संचालन वैशाली मुडे तर आभार प्रदर्शन प्राजक्ता आहाट हीने मानले.

२९डिसेंबर रोजी 'श्यामची आई' चित्रपटात साने गुरुजींची भूमिका पाड पाडणारे श्री माधव वझे(पुणे) यांच्या अनुभव कथनाचा व त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवाग्राम प्रतिष्ठानचे अध्यक्ष जयंतराव मठकर तर प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष व मा. प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे होत्या. चित्रपट सृष्टीत काम करताना आलेले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर जिवंत उभे केले. मी साने गुरुजींच्या वाङमयामुळे घडलो व हे करु शकलो असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांत जागृत करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे संचालन पुजा चावरे तर आभार प्रदर्शन डॉ. भिमनवार यांनी केले.

दि. १२/१/२०१८ रोजी रा.से.यो.च्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व स्वामी विवेकानंद जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गजानन कोटेवार तर प्रमुख पाहूणे मा. प्रा. डॉ. श्रीपाद भा. जोशी (अध्यक्ष, मराठी साहित्य परिषद) मा. प्रदिप दाते (अध्यक्ष वि.सा.संघ. वर्धा शाखा) हे होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकांनद यांच्या प्रतिमेला हारार्पण करुन झाली.स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या जीवन कार्याचा प्रवास कसा झाला. त्यांचा जयंती दिवस आणि राष्ट्रीय युवा दिवस म्हणून

साजरा का करतो याविषयी विस्तृत माहिती दिली. विवेकानंद हे तेजाच, उर्जेच, ज्ञानाच प्रतिक आहे. आपण त्याच ज्ञान आणि तेज स्विकाराव अस आव्हान श्री दाते यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. कोटेवार म्हणाले आपण विवेकानंदाचे चरित्र वाचून त्यांचा आदर्श स्विकारुन त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करावा. कारण स्वामी विवेकानंदाकडे सूर्याच तेज असूनही ते कोमल होते. कार्यक्रमाचे संचालन चावरे हीने तर आभार प्रदर्शन गुजर यांनी केले.

दि. २६/१/२०१८ ला प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने रा.से.यो. चे विद्यार्थी ८:३० वाजता ध्वजारोहणाच्या र्कक्रमाला उपस्थित राहील.

दि. ३० जानेवारी २०१८ रोजी नेहरु युवा केंद्र व रा.से.यो. च्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी पुण्यतिथी हा 'शहीद दिवस' म्हणून कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे तर प्रमुख पाहूणे नेहरु युवा केंद्राचे समन्वयक श्री संजय माटे गांधी विचाराचे प्रवक्ते किशोर जगताप, स्काऊट गाइडचे उपायुक्त प्रा. मोहन गुजर होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रध्दांजली घेवून झाली. तीनही वक्त्यांनी महात्मा गांधीचे विचार सांगून आजही गांधीजींची अत्योदय योजना ही समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा असे आव्हान केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

दि. १५ ते २१ मार्च या दरम्यान दत्तपूर येथे श्रमदान शिबिर घेण्यात आले.

दि. २२ मार्च २०१८ रोजी निसर्ग सेवा समितीचे आव्हान केल्याप्रमाणे महाविद्यालयातील २१ स्वयंसेवक प्रा. धात्रक व प्रा. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आय.टी.आय. टेकडीवर 'जागतिक जलदिन' कार्यक्रमाच्या निमित्ताने पाठविण्यात आले. सकाळी ७:३० ते ९:३० पर्यंत विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. झाडाला आळे करणे व चरे खोदले. चरे खोदण्यामागील उद्देश मा. बेलखोडे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाणी अडवून जिरविणे हा यामागील उद्देश. त्यांनंतर मा. वनउपसंरक्षक सुनिल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मा. अतुल तराळे नगराध्यक्ष, प्रा. शेख हाशम व श्री हांडे (गुरुदेव सेवा मंडळ, प्रसारक) यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणी समस्या, त्यांचा वापर आणि पाण्याची बचत यावर सर्वांनी विचार व्यक्त केले. पाणी टंचाई दूर करायची असेल तर वनसरंक्षण आणि गावातले पाणी गावात याचे किती महत्व आहे हे सांगितले. श्रमदानामध्ये ६ महाविद्यालयातील रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या व्यतीरिक्त दर शनिवारला वेगवेगळया विषयावर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरीता बौध्दीक कार्यक्रम व रविवारला श्रमदान घेण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना,
लोक महाविद्यालय, वर्धा

Principal
Lok Mahavidyalaya
WARDHA